**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 25-04-2023**

**नागपूर (महाराष्ट्र) मध्ये कुही साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2023-04-25 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2023-04-26 | 2023-04-27 | 2023-04-28 | 2023-04-29 | 2023-04-30 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 4.0 | 3.3 | 1.3 | 0.9 | 1.8 |
| कमाल तापमान (अं.से) | 35.8 | 35.7 | 35.4 | 36.0 | 35.8 |
| किमान तापमान (अं.से) | 23.5 | 23.0 | 23.2 | 22.9 | 23.1 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 64 | 60 | 59 | 58 | 54 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 34 | 32 | 30 | 32 | 29 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 13 | 12 | 14 | 8 | 9 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 165 | 84 | 171 | 177 | 200 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 6 | 6 | 5 | 5 | 6 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्य वर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक२६ ते ३० एप्रिल २०२३ दरम्यान आकाश आंशिक ते अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक २६, २७, २८, २९ व ३० एप्रिल २०२३ रोजी अति हलक्या ते हलक्या/मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • दिनांक २६ एप्रिल २०२३ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट व वादळी वारा (वेग- ४० ते ५० किमी/तास) वाहण्याची शक्यता, • दिनांक २७ एप्रिल २०२३ रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट व वादळी वारा (वेग- ३० ते ४० किमी/तास) वाहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

• पाऊस,मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता, शेतीमधील अति महत्वाची कामे हि सकाळी ११ वाजता पूर्वी करण्यास प्राधान्य द्यावे. तसेच स्थानिक हवामान अंदाज लक्षात घेऊनच शेती कामाचे नियोजन करावे. शेतकरी, शेतमजूर यांनी स्वतः झाडाखाली आसरा घेणे टाळावे तसेच जनावरे हि मोकळ्या जागेत चरावयास टाळावे, पशुधनास गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी. जनावरे (गायी, म्हशी, शेळ्या इत्यादी) हि झाडाखाली बांधणे कटाक्षाने टाळावे. जनावरांना बांधण्याचे ठिकाण हे इलेक्ट्रिक पोल, पाण्याचे स्त्रोत, उंच झाडे, जुनाट इमारती यापासून दुर असावे. आवश्यकता असल्यास गोठ्याची देखभाल व दुरुस्तीची कामे हि स्थानिक शांत व स्वच्छ हवामान असताना करावी. • पावसाचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील भुईमुग पिकाची काढणी केल्यानंतर शेंगा व शेतमाल तसेच हळद पिकाची काढणी करून शिजवल्यानंतर (afterboiling) उघड्या जागेत वाळवायला न ठेवता शेतमाल हा शेड मध्ये वाळवावा. शेडची व्यवस्था नसल्यास, शेतमाल शेतामध्ये उंचवट्याच्या ठिकाणी साठवावा तसेच मोकळ्या जागी ठेवलेला शेतमाल झाकण्यासाठी ताडपत्री किंवा प्लास्टिक शिट ची व्यवस्था करावी. • पावसाचा अंदाज लक्षात घेता, उशिरा पेरलेल्या परिपक्व अवस्थेतील गहू व इतर पिकांची काढणी व मळणी ची कामे तात्काळ पूर्ण करावी. • वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता, फळबागा आणि भाजीपाला पिकांना बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. • पाऊस, वादळी व गारपिटीमुळे फळे व भाजीपाला याचे नुकसान टाळण्यासाठी बाजारायोग्य फळांची काढणी व विक्री करावी. • पावसाचा अंदाज लक्षात घेता, कृषी बाजार व मंडई मध्ये शेतमाल खरेदीदारांनी शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेला शेतमाल उघड्यावर न ठेवता शेड मध्ये ठेवावा, जेणेकरून शेतमाल पावसाच्या संपर्कात येणार नाही. • कृषी रसायनांच्या फवारणीची कामे पुढील ३ दिवस वादळी वाऱ्याचा अंदाज पुढे ढकलावी. गारपीट ग्रस्त भाजीपाला व फळबागा मध्ये फवारणीची कामे हि स्थानिक स्वच्छ व शांत हवामान परिस्थिती असताना करावी. तसेच या कमी सकाळच्या वेळी प्राधान्य द्यावे. • विजांच्या ठिकाणांचे

निरीक्षण करण्यासाठी दामिनी लाईटनिंग अलर्ट (Damini- Lightning Alert ) या मोबाईल अँपचा वापर करावा. • नागपूर जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी हवामान आधारित कृषी सल्ला सेवा व्हॉट्सअॅपद्वारे प्राप्त करण्यासाठी डॉ. सचिन वानखेडे, विषय विशेषज्ञ, कृषी हवामान शास्त्र यांचा हा मोबाईल क्रमांक व्हॉट्सअॅपग्रुप मध्ये समाविष्ठ करावा. •

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• फवारणीची कामे पुढील ३ दिवस पुढे ढकलावी. गारपीट ग्रस्त भाजीपाला व फळबागा मध्ये फवारणीची कामे हि स्थानिक स्वच्छ व शांत हवामान परिस्थिती असताना करावी.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भुईमूग | • पावसाचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील भुईमुग पिकाची काढणी केल्यानंतर शेंगा व शेतमाल उघड्या जागी न साठवता शेड मध्ये वाळवावा. • शेडची व्यवस्था नसल्यास, मोकळ्या जागी ठेवलेला शेतमाल झाकण्यासाठी ताडपत्री किंवा प्लास्टिक शिट ची व्यवस्था करावी. |
| ऊस | • फेब्रुवारी महिन्यात लागवड केलेल्या सुरु उस पिकास (८ ते १० आठवड्यांनी) हेक्टरी २ पोती युरिया देऊन ओलीत करावे. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • पाऊस व गारपिटीमुळेसंत्रा पिकाच्या पाने, फांद्याव साल यावर विविध रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. गारपीट/प्रादुर्भाव ग्रस्त तुटलेल्याफांद्यासेकेटर्सच्यासहाय्याने काढून टाकाव्या. झाडांच्याप्रादुर्भाव ग्रस्त भागांवरबोर्डोपेस्ट लावावी. • गारपिटीमुळेनागपुरी संत्रा पिकामध्ये फळ गळ नियंत्रितकरण्यासाठी १.५ ग्राम २-४-डी + १०० ग्राम कार्बेन्डाझिम + १.५ किलो युरिया100लिटरपाण्यात मिसळून स्वच्छ व शांत हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. • १५ दिवसानंतर फळबागांमध्येदुसरी फवारणी १.५ग्राम गिबेरेलिकऍसिड (GA3) + १.५ किलोपोटॅशियमनायट्रेट१००लिटरपाण्यातमिसळून स्वच्छ व शांत हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| स्वेट ऑरेंज | • पाऊस व गारपिटीमुळेमोसंबी पिकाच्या पाने, फांद्याव साल यावर विविध रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. गारपीट/प्रादुर्भाव ग्रस्त तुटलेल्याफांद्यासेकेटर्सच्यासहाय्याने काढून टाकाव्या. झाडांच्याप्रादुर्भाव ग्रस्त भागांवरबोर्डोपेस्ट लावावी. • गारपिटीमुळेमोसंबी पिकामध्ये फळ गळ नियंत्रितकरण्यासाठी १.५ ग्राम २-४-डी + १०० ग्राम कार्बेन्डाझिम + १.५ किलो युरिया100लिटरपाण्यात मिसळून स्वच्छ व शांत हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. • १५ दिवसानंतर फळबागांमध्येदुसरी फवारणी १.५ग्राम गिबेरेलिकऍसिड (GA3) + १.५ किलोपोटॅशियमनायट्रेट१००लिटरपाण्यातमिसळून स्वच्छ व शांत हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| कागदी लिंबू | • लिंबू बागांमध्येपाऊसआणिगारपिटीमुळेलिंबूवर्गीयकॅन्कर(Citruscanker) मोठ्याप्रमाणातहोतो. लिंबू च्या बागेतील प्रादुर्भाव ग्रस्त भागाची छाटणी करावी. १८० ग्रॅमकॉपरऑक्सिक्लोराईडआणि६ग्रॅमस्ट्रेप्टोसायक्लिन६० लिटरपाण्यातमिसळून स्वच्छ व शांत हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| हळद | • पावसाचा अंदाज लक्षात घेता, हळद पिकाची काढणी करून शिजवल्यानंतर (Boiling) उघड्या जागेत वाळवायला न ठेवता शेड मध्ये वाळवावी. • शेडची व्यवस्था नसल्यास, मोकळ्या जागी ठेवलेला शेतमाल झाकण्यासाठी ताडपत्री किंवा प्लास्टिक शिट ची व्यवस्था करावी. |
| कोबी | • सद्य परिस्थितील ढगाळ हवामान लक्षात घेता, कोबी व फुल कोबीवरील वरील मावा किडीच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० ईसी १३ मिली किंवा सायंट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी १२ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • सद्य परिस्थितील ढगाळ हवामान लक्षात घेता, कोबी व फुल कोबीवरील वरील चौकोनी ठीपक्याच्या पतंग कीड व्यवस्थापनासाठी, क्लोरपायरीफॉस २० ईसी ४० मिली किंवा स्पिनोसॅड २.५ एससी १२ मिली किंवा फेनवलेरेट २० ईसी ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |
| मिरची | • फुलांची गळ कमी करण्यासाठी प्लॅनोफिक्स ५ मी.ली., प्रती ९ लिटर पाण्यात मिसळून मिरची लागवडीनंतर ५० व ७० दिवसांनी फवारणी करावी. सद्यपरिस्थितीत मिरची पिकावरील रसशोषक |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | किडीच्या नियंत्रणाकरिता, ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ईमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.मिरची पिकामध्ये फुलकिडे, फळे पोखरणारी अळी व तंबाखूची पाने खाणारी अळीने आर्थिक नुकसान पातळी असल्यास सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १२.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. • फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |
| टोमॅटो | • टमाटे पिकामध्ये नागअळी, मावा, फुलकिडे, पंढरी माशी व फळे पोखरणाऱ्या अळीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास व्यवस्थापनासाठी सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १८.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. • फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी व सावलीमध्ये निवाऱ्याची व्यवस्था करावी. जनावरांकडून (उदा. बैल) सकाळी ११ ते दुपारी ०४ वाजता दरम्यान काम करणे टाळावे. गोठ्यातील तापमान गोठ्याचे शेड ला पांढरा रंग द्यावा. शक्य असल्यास शेड मध्ये पाण्याचा फवारा व फोगर्स चा लावावे. जास्त उष्णतेच्या काळात जनावरांच्या अंगावर पाणी फवारावे. जनावरांच्या आहारात हिरवा चारा, प्रथिने, खनिज मिश्रण व मिठाचा समावेश करावा. |
| गाय | • दुभत्या गाईस दररोज ८ किलो वाळलेला चारा + ६ किलो हिरवा चारा आणि १ किलो खुराक द्यावा. खुराक मिश्रण करताना मका, ज्वारी, बाजरी, गव्हाचा कोंडा याचा वापर करावा. खुरकात २० ग्राम प्रती किलो या प्रमाणात मिश्रण मिसळावे. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | • उष्णतेपासून संरक्षण मिळण्यासाठी कोंबड्यांच्या शेड ला कापडी पडदे लावावे तसेच हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्हीशेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षितठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडापालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवूनतळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीलास्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणीकिंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे.जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावरआश्रय घ्यावा. |
| सामान्य सल्ला | • शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: विजांच्याबचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेचजनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासूनशक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे.शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी.शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोनव्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची |

| **इतर (माती / जमीन तयार करणे)** | **इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला** |
| --- | --- |
| | दांडीअसलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासूनबनलेल्या इतर कृषी अवजारांपासून दूर रहा. |
| सामान्य सल्ला | • हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. * संशोधनावर आधारित शिफारस. दोन किंवा त्यापेक्षा अधिक रसायने किंवा संजीवके एकत्र मिसळू नये. |